# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4
Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## Office of the Director Students' Welfare

**Dr.I.S. Mohurley**
**Director**
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** director.studentwelfaregug@ gmail.com

**पत्र क्र. No.GU/DSW/ 212/2015** **Dt: 11 /12 /2015**

प्रति,

मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय:- श्री ज्ञानेश महाविद्यालय नवरगाव, जि. चंद्रपूर येथे आयोजीत विद्यापीठस्तरीय वादविवाद स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाची चमू संघ सहभागी करण्याबाबत.**

महोदय/महोदया,

आपणास कळविण्यात येते की, भारतीय शिक्षण संस्था नवरगाव, जि. चंद्रपूर संचालित श्री ज्ञानेश महाविद्यालय नवरगाव च्या वतीने **''लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून समकालीन प्रसारमाध्यमे यशस्वी होत आहेत/नाहीत''** या विषयावर विद्यापीठस्तरीय वादविवाद स्पर्धेचे **शनिवार दि. २ जानेवारी २०१५ रोजी सकाळी ११ वाजता** आयोजन करण्यात आले आहे.

विजेत्या स्पर्धकांना प्रथम पुरस्कार रु. १०००/—, द्वितीय पुरस्कार रु. ७००/—, उत्तेजनार्थ पुरस्कार रु. ५००/— असून सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. नियमावली संलग्न केली आहे.

करिता आपण आपल्या महाविद्यालयाची चमू उपरोक्त विद्यापीठस्तरीय वादविवाद स्पर्धेत सहभागी करुन घ्यावी, ही विनंती.

कळावे,

धन्यवाद!

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
संचालक विद्यार्थी कल्याण

संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**सहपत्रे: वरीलप्रमाणे**

भारतीय शिक्षण संस्था संचालीत

# श्री ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव जि. चंद्रपुर

प्रति,

मा. प्राचार्य

सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

~~महोदय~~,

भारतीय शिक्षण संस्थेचे संस्थापक पुज्यनिय बालाजी पाटील बोरकर यांच्या पुण्यतिथी सोहळया निमीत्य आमच्या श्री ज्ञानेश महाविद्यालय नवरगाव तर्फे **"लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून समकालीन प्रसार माध्यमे यशस्वी होत आहेत /नाहीत"** या विषयावर विद्यापीठ स्तरीय वादविवाद स्पर्धा दि. २ जानेवारी २०१५ ला सकाळी ११वाजता आयोजित करण्यात आली आहे.

सन १९५० मध्ये नवरगाव सारख्या छोटयाश्या गावात स्वर्गीय बालाजी पाटील बोरकर यांनी भारतीय शिक्षण संस्थेच्या रूपात शैक्षणिक कार्याची मुहूर्तमेढ रोवली. सन १९६८ मध्ये संस्थे अंतर्गत श्री ज्ञानेश महाविद्यालयाची स्थापणा करण्यात आली. आज हा शिक्षणाचा वटवृक्ष बहरलेला आहे. स्व. बालाजी पाटील बोरकर यांना अभिवादन करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

आपण आपलया महाविद्यालयातून प्रस्तूत स्पर्धेकरीता दोन विद्यार्थांचा संघ पाठवून सहकार्य करावे ही विनंती.

धन्यवाद!

- ~~स्पर्धेचे नियम पुढील पानावर आहेत~~
- प्रथम पुरस्कार — १०००/— व सन्मान चिन्ह
- द्वितीय पुरस्कार .— ७००/— व सन्मान चिन्ह
- उत्तेजनार्थ पुरस्कार .— ५००/— व सन्मान चिन्ह

**समन्वयक**

प्रा. ललीत उजेडे

(९४०३८८३२८०/८६०५९७०९२७)

Shri D.M.V. Nawargaon
ARTS-SCI.
SENIOR / JUNIOR

**प्राचार्य**

डॉ. सुरेश बाकरे
**Principal**
Shri Dnyanesh Mahavidyalaya
Nawargaon, Dist. Chandrapur

# वादविवाद स्पर्धा २०१६

## विषय– लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणुन समकालीन प्रसार माध्यमे यशस्वी होत आहेत/नाहीत.

### स्पर्धेचे नियम

१) प्रत्येक महाविद्यालयातुन दोन विद्यार्थ्यांचा एकमेव संघ स्पर्धेत सहभागी होईल. एकच विद्यार्थी आल्यास सहभागी होता येणार नाही.

२) स्पर्धेकरीता सकाळी ११ वा. पुर्वी उपस्थित राहुन नोंदणी करावी लागेल. नोंदणी करीता विद्यार्थ्याची नावे असलेले महाविद्यालयाचे पत्र व ओळखपत्र आवश्यक आहे.

३) स्पर्धेमध्ये संघातील एक विद्यार्थी विषयाच्या सकारात्मक बाजुने व दुसऱ्या विद्यार्थ्याने नकारात्मक बाजुने मत मांडणे आवश्यक राहील.

४) स्पर्धेचे परिक्षण व्यक्तीशः होणार नाही तर महाविद्यालयाच्या संघाचे मुल्यांकन ग्राहय धरण्यात येईल.

५) विषयाचे ज्ञान, विषयाची मांडणी, देहबोली व मुद्यांची खोडणी या आधारावर परिक्षण करण्यात येईल.

६) परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

७) प्रत्येक स्पर्धेकाला ७ मिनिटे वेळ देण्यात येईल. पाच मिनिटानंतर गजर वाजवुन उर्वरित २ मिनिटात आपली मते आटोपते घेणे आवश्यक असेल.

८) पहिल्या स्पर्धकास शेवटी मत मांडण्यास ३ मिनिटाचा कालावधी देण्यात येईल.

९) स्पर्धकांना कोणात्याही प्रकारचा प्रवास व दैनिक भत्ता देय राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

१०) स्पर्धेचा निकाल त्याच दिवशी स्पर्धा संपल्यावर लगेच घोषित करण्यात येईल

समन्वयक
प्रा. ललीत उजेडे
सहायक अधिव्याख्याता
इंग्रजी विभाग

Shri D. M. V. Nawargaon
ARTS-SCI.
SENIOR / JUNIOR

प्राचार्य
डॉ. सुरेश एस. बाकरे
श्री ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव,
जि. चंद्रपुर